प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 7 Feb 2025_016
07 Feb 2025
www.dainikprabhat.com



**कोंढवा : सहायक आयुक्त विशाल लोंढे यांचे स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष जालिंदर कामठे.**

# निर्भय कन्या अभियान कार्यशाळा

**कोंढवा, दि. ६ (प्रतिनिधी) -** वसंतदादा पाटील प्रतिष्ठानच्या गुरुवर्य सदानंद महाराज कला व वाणिज्य महाविद्यालयात आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय निर्भय कन्या अभियान कार्यशाळा झाली. संस्थाध्यक्ष जालिंदर कामठे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. प्रमोद बोत्रे उपस्थित होते. पुणे समाज कल्याणचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी स्त्री हक्क, अधिकार विषयक नियम. संहिता-कायदे या विषयावर मार्गदर्शन केले. मुलींनी मानसिक आणि शारिरीकदृष्ट्या सक्षम आणि निडर व्हावे. वेळप्रसंगी खंबीरपणे स्वसंरक्षणासाठी प्रतिकार करावा, असेही लोंढे यांनी सांगितले. यावेळी संस्थाध्यक्ष जालींदर कामठे, प्रभारी प्राचार्य डॉ. विवेकानंद ससाणे, प्रा. मनीषा काकडे, प्रा. मीरा बडे, प्रा. पल्लवी भोसले, प्रा. दीपक कांबळे, प्रा. दत्ता चव्हाण , लिपिक सुवर्णा कांबळे, विजय डोईफोडे आदी उपस्थित होते. डॉ. नीलम गोयल यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सोनाली घोलप, डॉ. योगिता कुंजीर यांनी आभार मानले.